जा.क्र.:कबचौउमवि/१६//२०२२ दिनांक :-२२ फेब्रुवारी, २०२३

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडून आलेल्या प्राचार्य, अध्यापक, व्यवस्थापन प्रतिनिधी आणि नोंदणीकृत पदवीधर यांच्या प्रतिनिधीमधून व्यवस्थापन परिषदेवर निवडून द्यावयाच्या सदस्यांकरीता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला असून १६ मार्च रोजी सिनेटच्या बैठकीत निवडणूक होणार आहे.

कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.विनोद पाटील यांनी ही अधिसूचना जारी केली आहे. सिनेट मधून व्यवस्थापन परिषदेवर आठ जागा निवडून दिल्या जाणार आहेत. त्यामध्ये प्राचार्यांच्या दोन प्रतिनिधींपैकी एक खुला संवर्ग व एक अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. शिक्षकांच्या दोन प्रतिनिधींपैकी एक खुला संवर्ग व एक विमुक्त जाती व भटक्या जमातीसाठी राखीव आहे. व्यवस्थापन प्रतिनिधींच्या दोन जागांपैकी एक जागा खुला संवर्ग आणि एक अनुसूचित जमातीसाठी राखीव आहे. नोंदणीकृत पदवीधरांच्या दोन जागांपैकी एक जागा खुला संवर्ग आणि एक इतर मागासवर्ग यासाठी राखीव आहेत.

३ मार्च रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ यावेळेत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. ६ मार्च रोजी प्राप्त अर्जांची छाननी होऊन वैध व अवैध उमेदवारी अर्जांची यादी जाहीर होईल. ८ मार्च रोजी दुपारी १२.३० पर्यंत या वैध – अवैध उमेदवारीबाबत कुलगुरुंकडे अपील करता येईल. त्याच दिवशी कुलगुरु अपिलाबाबत निर्णय जाहीर करतील. ९ मार्च रोजी दुपारी १२.३० वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. १० मार्च रोजी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी जाहीर केली जाईल. १६ मार्च रोजी होणाऱ्या सिनेटच्या बैठकीत निवडणूक होईल आणि त्याच दिवशी मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. यासंदर्भात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

---

## बातमी क्र. २

जळगाव दि.२२ ( ) नेट, सेट आणि पेट परीक्षेत यश संपादन करण्यासाठी मार्गदर्शन कार्यशाळांची गरज असून अशा कार्यशाळा निश्चितच यश मिळवून देवू शकतात. अभ्यासात सातत्य असेल तर प्रत्येक परीक्षार्थी यशस्वी होवू शकतो, असा मौलिक सल्ला विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे यांनी दिला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या माध्यमशास्त्र प्रशाळेतर्फे दि. २२ ते २४ फेब्रुवारी २०२३ तीन दिवसीय नेट - सेट - पेट मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मंचावर माध्यमशास्त्र प्रशाळेचे संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर, तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा.डॉ. कमलाकर पायस (तक्षशिला महाविद्यालय, अमरावती), प्रा.डॉ राजेश बोबडे (शामाप्रसाद मुखर्जी महाविद्यालय शेंदूरजनाघाट, वरूड, जि.अमरावती), प्रा.डॉ.पल्लवी इंगोले (वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी, जि.अमरावती) उपस्थित होते. प्र-कुलगुरू प्रा. इंगळे

म्हणाले की, नेट-सेट चा पहिला पेपर शिकविणे हे शिक्षकांचे फार मोठे कौशल्य आहे. नेट-सेट ची तयारी करतांना प्रत्येक परीक्षार्थींनी अभ्यासक्रमाची माहिती करून घेणे अपेक्षित आहे. त्यांनतर त्यातील अडचणी काय ? समस्या काय ? या जाणून घेवून अभ्यासाच्या तयारीच्या आराखडा तयार केल्यास भविष्यात यश निश्चितच मिळते.

प्रास्ताविकात संचालक प्रा.डॉ.सुधीर भटकर यांनी नेट-सेट-पेट कार्यशाळेसंदर्भात भूमिका विशद करून आजपर्यंत आयोजित केलेल्या कार्यशाळेतून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा आढावा मांडला. सूत्रसंचालन डॉ.रोहित कसबे यांनी केले. आभार डॉ.गोपी सोरडे यांनी मानले. उद्घाटन सत्रानंतर पहिल्या सत्रात तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा.डॉ. कमलाकर पायस (तक्षशिला महाविद्यालय, अमरावती), दुस-या सत्रात प्रा.डॉ.पल्लवी इंगोले (वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी, जि.अमरावती) तर तिस-या सत्रात प्रा.डॉ राजेश बोबडे (शामाप्रसाद मुखर्जी महाविद्यालय शेंदूरजनाघाट, वरूड, जि.अमरावती) यांनी मार्गदर्शन केले. यशस्वीतेसाठी डॉ.सोमनाथ वडनेरे, रंजना चौधरी, प्रकाश सपकाळे, पंकज शिंपी, प्रल्हाद लोहार, कुंदन ठाकरे, महेश पाटील, भिकन बनसोडे यांनी परिश्रम घेतले.

---

## बातमी क्र. ३

जळगाव दि.२२ (प्रतिनिधी) जापान येथील तोकुशिमा विद्यापीठ व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत इलेक्ट्रॉनिक्स विभागाकडील एम.एस्सी. व्दितीय वर्षाचा विद्यार्थी यशल प्रकाश नारखेडे याची तोकूशिमा विद्यापीठात २६ फेब्रुवारी ते ६ मार्च या कालावधीत आयोजिलेल्या "स्प्रिंग स्कूल २०२३" साठी निवड झाली आहे.

यशल याला जापान तसेच इतर देशांच्या विद्यार्थ्यांसमवेत हा दहा दिवसांचा विज्ञान व तंत्रज्ञानातील अत्यंत महत्वपूर्ण असा अभ्यासक्रम पूर्ण करुन तोकूशिमा शहरातील काही नामांकित कंपन्या व विद्यापीठातील अद्ययावत प्रयोगशाळांमध्ये प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील तज्ज्ञ प्राध्यापक, तंत्रज्ञ व संशोधकांशी चर्चा करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

यशल नारखेडे याचे विद्यापीठाचे प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, अधिष्ठाता प्रा. अनिल डोंगरे व आंतरराष्ट्रीय विद्यार्थी कक्षाचे सल्लागार प्रा.ए.एम.महाजन यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी